31 MAR 2017 तरुण भारत

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : आई-वडिलांच्या स्मरणार्थ एक लाख रुपयांच्या निधीचा धनादेश कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे सुपुर्द करताना प्रा. के. एम. मोरे. सोबत डॉ. एम. एल. जाधव, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे.

31 MAR 2017 लोकमत

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# माहिती-तंत्रज्ञानात विद्यार्थ्यांना रोजगार मिळावेत

## देवानंद शिंदे : अभियांत्रिकी महाविद्यालयांमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**कोल्हापूर** : माहिती-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात विद्यार्थ्यांना रोजगार मिळावेत, यासाठी नॅसकॉम, देवांग मेहता फाउंडेशन ट्रस्टने पुढाकार घ्यावा, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी येथे केले.

नॅसकॉम, देवांग मेहता फाउंडेशन ट्रस्ट आणि शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित देवांग मेहता स्मृती व्याख्यानमाला आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी देवांग मेहता फाउंडेशन ट्रस्टचे विश्वस्त पी. श्रीगणेश, 'नॅसकॉम'चे विभागीय प्रमुख डॉ. चेतन सामंत प्रमुख उपस्थित होते. कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, माहिती-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही देश-विदेशांत शिवाजी विद्यापीठाचे अनेक विद्यार्थी विविध पदांवर कार्यरत आहेत. नॅसकॉम, देवांग मेहता फाउंडेशन ट्रस्टने पुढाकार घेतल्यास विभागातील शिक्षण आणि माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील दरी साधली जाईल. स्थानिक विद्यार्थ्यांना माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील नवनवीन संधींची माहिती प्राप्त होईल. पी. श्रीगणेश म्हणाले, भारत ही माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात महाशक्ती बनेल, असे भाकीत देवांग मेहता यांनी त्या काळात वर्तविले होते. एकविसाव्या शतकातील भारताच्या गरजा अधोरेखित करताना त्यांनी 'रोटी, कपडा, मकान, बिजली और बँड विड्थ' अशी घोषणा दिली होती. डॉ. सामंत म्हणाले, विद्यार्थ्यांना नवनवीन रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याचे 'नॅसकॉम'चे प्रयत्न राहतील. कार्यक्रमात शेल्टर असोसिएट्सच्या अध्यक्ष डॉ. लताताई श्रीखंडे, वरिष्ठ जीआयएस विश्लेषक प्रदीप वझे, चेंदिल कुमार, डॉ. भूषण केळकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. (प्रतिनिधी)